# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail : desk 8 @ dte.org.in Internet :http/www.dte.org


क्रमांकः ८/तंशिसं/अंनियो/२०११/३६२

दिनांक : 16 जून JUN 2011

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

**विषय :- नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करणेबाबतची विहीत कार्यपध्दती.**


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
24 JUN 2011
आवक क्र. ४८४०


**संदर्भ** :- १. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५.

२. शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ७ जुलै, २००७.

३. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग निर्णय क्र. अंनियो/२०१०/(६७८/१०)/विशी-१, दिनांक २५.३.२०११.

राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्र. १ अन्वये नवीन अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. व संदर्भीय शासन निर्णय क्र. २ अन्वये उपरोक्त योजनेची अंमलबजावणी/कार्यपध्दती विहीत केली आहे.

राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे ही योजना अकृषी विद्यापीठे व संलग्नित मान्यताप्राप्त अुनदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने इ. मधील अनुदानित मंजूर पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सदरची योजना लागू केली आहे व उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्र. ३ अन्वये सदरच्या योजनेची अंमलबजावणी करणेबाबतची कार्यपध्दती विहीत केलेली आहे.

राज्यातील अशासकीय अनुदानित तंत्रशास्त्र संस्थेतील मंजूर पदावरील कर्मचा-यांना वरील योजना लागू केल्यानंतर वरील योजनेच्या अंतर्गत संदर्भीय शासन निर्णय क्र. ३ अन्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयांत स्वतंत्र उपराज्य अभिलेख देंखभाल अभिकरणाची स्थापना करण्यांत येत असून सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय हे उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण म्हणून काम पाहतील. सदरहू उपराज्य अभिलेख देंखभाल अभिकरणामार्फत संस्थेतील अनुदानित मंजूर पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे. तसेच संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम करतील.

तरी आपल्या कार्यक्षेत्राअंतर्गत कार्यरत असलेल्या अशासकीय अनुदानित संस्थेत मंजूर पदावर ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती दिनांक १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर झाली असेल अशा नियुक्त झालेल्या कर्मचा-यांचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनासंबंधीचे काम आपणाकडून करावयाचे आहे. तरी सदरचे काम करतेवेळेस महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्र. ३ मध्ये विहीत केलेली कार्यपध्दती अंमलात आणावयाची आहे. **सदरचा शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केलेला आहे.** ज्याप्रमाणे सद्यःस्थितीत आपणाकडुन अशासकीय अनुदानित संस्थेतील कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे ठेवले जातात त्याचप्रमाणे आपणाकडून सदर योजनेची कार्यवाही करण्यांत यावी. परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून द्यावयाच्या नियोक्त्यांच्या सममूल्य अंशदानाबाबत तसेच त्यावरील व्याजाच्या संदर्भात अर्थसकल्पिय अंदाजाद्वारे आपणाकडून मागणी करण्यांत यावी.

आपणाकडून उपरोक्त योजनेअंतर्गत करण्यांत येत असलेल्या कार्यवाहीची माहिती संस्थानिहाय/कर्मचारीनिहाय संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांचेकडे वेळोवेळी पाठविण्यांत यावी.

( डॉ. सु.का. महाजन )
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

**जा.क्र.- विकापु/आस्था-२/अंनियो/२०११/** 6394

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,**
**पुणे:-४११०१६.**
**दिनांक:-** 25 JUL 2011

**प्रति-सर्व अशासकीय अनुदानित तंत्रशास्त्र संस्थांना संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्राची सहपत्रासह छायाप्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

**(बी.डी. मिसाळ)**
**प्रशासकीय अधिकारी**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.**

**प्रत:-** १. **श्री. शिंदे प्रोग्रॅमर वि.का.पुणे यांना संदर्भाधिन पत्र सहपत्रासह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.**

2. लेखा विभाग, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे : मा.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई यांनी निर्देश दिल्यानुसार या पुढील कर्यवाहीचे अनुपालन करण्यासाठी.